## जनसंपर्क विभाग

जळगाव ३०, (प्रतिनिधी) : ट्रान्सजेंडर व्यक्तीकडे माणूस म्हणून बघण्याचे आणि त्यांच्या अस्तित्वाला प्रतिष्ठा देण्याचे सामाजिक भान निर्माण करण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज असल्याचा सूर 'ट्रान्सजेंडर आणि सामाजिक भूमिका' या विषयावर विद्यापीठाच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या माध्यमशास्त्र प्रशाळेच्या वतीने आयोजित कार्यशाळेत व्यक्त झाला.

विद्यापीठातील माध्यमशास्त्र प्रशाळा आणि नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सोशल डिफेन्स, मिनिस्ट्री ऑफ सोशल जस्टीस ॲण्ड एम्पावरमेंट, नवीदिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, दि. ३० सप्टेंबर रोजी 'ट्रान्सजेंडर आणि सामाजिक भूमिका' या विषयावर कार्यशाळा झाली. यावेळी अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू प्रा.एस.टी.इंगळे, प्रमुख अतिथी म्हणून उपजिल्हाधिकारी निवृत्ती गायकवाड उपस्थित होते. या कार्यशाळेत सामाजिक कार्यकर्ते भरत अमळकर, रंगकर्मी शंभू पाटील, सामाजिक कार्यकर्ते जयसिंग वाघ व वासंती दिघे यांनी भूमिका मांडली.

निवृत्ती गायकवाड आपल्या भाषणात म्हणाले की, राज्यघटनेने ट्रान्सजेंडर व्यक्तींना देखील जगण्याचे अधिकार दिले आहेत. भारतीय विचारसरणीत एलजीबीटीक्यू समूहाला सुरक्षित वातावरण देण्याला आपण कमी पडत आहोत. त्यांना सुरक्षित वातावरण दिले जावे. शासकीय पातळीवर विविध कायदे केले जात आहेत असे ते म्हणाले. प्रा. एस.टी. इंगळे यांनी आपल्या भाषणात शिक्षण, आरोग्य आणि रोजगार या तीन पातळयांवर समाज आणि शासनाने ट्रान्सजेंडर व्यक्तींसाठी काम केले तर प्रश्न सुटायला मदत होईल असे मत व्यक्त केले.

भरत अमळकर यांनी कोणतीही व्यक्ती जन्माला येण्याआधी आपले पुर्वग्रह जन्माला आलेले असतात असे सांगून ट्रान्सजेंडर व्यक्ती जन्मत: कुणी नसते. तर वयात आल्यानंतर शारीरिक बदल दिसून येतात. त्यावेळी त्यांना समाजाकडून उपेक्षा सहन कराव्या लागतात. संत साहित्य व अध्यात्मात लिंगाला कधीही मर्यादे पलिकडे महत्व दिलेले नाही. स्त्री आणि पुरूष या दोनच वर्गात समाज विभागला गेला आहे. ट्रान्सजेंडर वर्गाचे प्रश्न समजून वैज्ञानिक दृष्टीकोनातून त्याकडे बघावे असे मत त्यांनी व्यक्त केले. शंभू पाटील यांनी रामायण, महाभारत व पुरातन काळातील अनेक संदर्भ देत ट्रान्सजेंडर हा वर्ग पुर्वापार कसा वाटचाल करत आला आहे हे स्पष्ट केले. अनेक युरोपिय संकल्पना आपल्याकडे आल्यात. इंग्रजांनी राज्य करतांना त्या संकल्पना लादल्या आणि सामाजिक भान गमावून बसलो. या देशात स्त्रीयांसाठी लक्ष्मण रेषा आखली गेली. पंरपरा आणि सामाजिक वास्तव यामध्ये आपण कायम गोंधळलेलो आहोत. ट्रान्सजेंडर हीच मुळी समस्या नाही तर समाज म्हणून आपण काय आहोत, आपली सामाजिक भूमिका काय हाच खरा प्रश्न असल्याचे शंभू पाटील म्हणाले.

जयसिंग वाघ यांनी सर्व राजकीय प्रक्षांनी ट्रान्सजेंडर सेल सुरू करून या वर्गाशी संवाद साधला तर प्रश्न सुटायला मदत होईल. तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाने पुढाकार घेवून ट्रान्सजेंडर व्यक्तींसाठी शिष्यवृत्ती ठेवली तर शिक्षणाचे प्रमाण वाढेल अशी अपेक्षा व्यक्त केली. वासंती दीघे यांनी पुरूषसत्ताक व लिंगसापेक्ष प्रतिष्ठा देणारी जीवन पध्दती आपल्याकडे असल्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहे असे सांगितले. ट्रान्सजेंडर व्यक्तीची कुटूंबाकडूनच हत्या होण्याचे प्रमाण वाढले आहे. या समूहाला दमनाला तोंड द्यावे लागते. त्यांना समूह न बघता व्यक्ती म्हणून बघितले जावे, संपत्तीत अधिकार द्यावा अशी अपेक्षा वासंती दिघे यांनी व्यक्त केली. प्रारंभी माध्यमशास्त्र प्रशाळेचे संचालक तथा कार्यशाळेचे मुख्य निमंत्रक प्रा. सुधीर भटकर यांनी प्रास्ताविकात कार्यशाळेच्या आयोजनामागील भूमिका विषद केली. सह निमंत्रक डॉ. गोपी सोरडे यांनी सूत्रसंचालन केले. ॲड· सूर्यकांत देशमुख यांनी आभार मानले. अमोल पाटील या विद्यार्थ्यांने सत्राचे सूत्रसंचालन केले. परीक्षा मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. योगेश पाटील यांच्या उपस्थितीत या कार्यशाळेचा समारोप झाला. वैभव भोंबे यांनी आभार मानले. रंजना चौधरी, प्रल्हाद लोहार, मंगेश बविसाने, पंकज शिंपी, धनंजय देशमुख यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परीश्रम घेतले.

**बातमी नं.२**

जळगाव ३०, (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान केंद्राच्या वतीने नंदूरबार जिल्हयातील सहा माध्यमिक शाळेतील व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी 'फिरती विज्ञान प्रयोगशाळाची व्हॅन' उपलब्ध करून देण्यात आली. दोन दिवसात २७०० विद्यार्थ्यांनी त्याचा फायदा घेतला.

विज्ञानात गोडी निर्माण व्हावी यासाठी ही विज्ञान प्रयोगशाळा व्हॅन नंदूरबार जिल्ह्यातील शहादा, धडगाव या तालुक्यातील शेठ वि.के. शाह विद्यालय, शहादा, कै. सौ. जी.एफ. पाटील कनिष्ठ महाविद्यालय, शहादा , एस.टी.ई.एस आणि सहकारी शिक्षण संस्था विज्ञान महाविद्यालय, शहादा. धडगाव तालुक्यातील शासकीय आश्रमशाळा, चुलवड, शासकीय आश्रमशाळा, मंडवी बुद्रुक आणि शासकीय आश्रमशाळा, काकरदा येथील विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आली. फिरती विज्ञान प्रयोगशाळा बस मधील ३० पेक्षा जास्त प्रयोगांचे प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. २७०० विद्यार्थ्यांनी व ग्रामस्थांनी ही व्हॅन पाहिली. प्रा. एस.आय. पाटील, प्रा. संदीप मराठे, उल्हास सोनवणे, प्रा. आय.जे. पाटील, कार्तिक शेल्के, गौरव पाटील, राहुल हजारी आणि ऋषिकेश चौधरी तसेच वाहनचालक मन्साराम राठोड यांनी सहकार्य केले अशी माहिती समन्वयक प्रा.एस.एस. घोष यांनी दिली.

जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्हयातील शाळांना सूचित करण्यात येते की, ज्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी 'फिरती विज्ञान प्रयोगशाळेच्या बस' चा लाभ घ्यावयाचा असेल त्यांनी राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग, कवयित्री बहिणाबाई चोधरी महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावचे समन्वयक प्रा. एस.एस. घोष यांचेशी संपर्क करावा असे आवाहन केले आहे. संपर्क क्र. 8999545292 तसेच ई-मेल ssghosh@nmu.ac.in.

**बातमी नं. ३**

जळगाव ३०, (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विचारधारा प्रशाळेअंतर्गत महात्मा गांधी अध्ययन व संशोधन केंद्राच्यावतीने दि. २ ते ८ ऑक्टोबर या कालावधीत गांधी सप्ताहा निमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

बुधवार दि. २ ऑक्टोबर रोजी स. ८ वाजता महात्मा गांधी टेकडीवर भजन प्रभात होणार आहे. दि. ३ ऑक्टोबरला नंदुरबारच्या आदिवासी अकादमीत गांधी विचार व श्रम संस्कार शिबीर होईल. दि. ४ ऑक्टोबर रोजी अमळनेरच्या प्रताप तत्त्वज्ञान केंद्रात माजी कुलगुरू प्रा. एन.के. ठाकरे यांचे विशेष व्याख्यान सकाळी १० वाजता होणार आहे. याच दिवशी धुळे येथील विद्यावर्धिनी महाविद्यालयात निबंध स्पर्धा होईल. दि. ५ ऑक्टोबर रोजी केंद्रीय विद्यालयात चित्रकला स्पर्धा होणार आहे. सोमवार दि. ७ ऑक्टोबर रोजी विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्र प्रशाळेच्या सभागृहात भित्ती पत्रक व वक्तृत्व स्पर्धा होणार आहे. मंगळवार दि. ८ रोजी सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या सिनेट सभागृहात सामाजिक कार्यकर्ते डॉ. अमृत बंग यांचे व्याख्यान होणार आहे. अशी माहिती कुलसचिव डॉ. विनोद पाटील, विचारधारा प्रशाळेचे प्रभारी संचालक प्रा. म.सु. पगारे, गांधी केंद्राचे विभाग प्रमुख डॉ. उमेश गोगडीया व रा.से.यो. संचालक डॉ. सचिन नांद्रे यांनी दिली.

.................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ३० सप्टेंबर, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी